# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक ३१८-२२** **दिनांक २०/१०/२०२२**

## घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीस अटक करुन एकुण ७,४०,५००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक २२/०८/२०२२ रोजी तक्रारदार सलमा अब्दुल मेहतर वय-४४ वर्षे यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, तक्रारदार या दिनांक २१/०८/२०२२ रोजी रात्रीच्या सुमारास घराबाहेर रस्त्यावर फोनवर बोलत असतांना कोणीतरी अनोळखी इसमाने फिर्यादीचे मानेवर मागील बाजूस कशाने तरी मारहाण करुन फिर्यादीस बेशुद्ध केले, तसेच फिर्यादीचे डावे कानाला कुठल्यातरी तिक्ष्ण हत्याराने वार करुन दुखापत केली व नंतर फिर्यादीस चाकूचा धाक दाखवुन त्यांचे नाकातील साधारण दोन ग्रम वजनाची सोन्याची चमकी, ७५०/- रुपये रोख व सॅमसंग कंपनी ऐ ३० हा मोबाईल असा एकुण १०,७५०/-रुचा ऐवज घेवून जबरीने घेवून गेला आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३४८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९४, ३४२, ५०६ प्रमाणे अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांपासुन रात्रीच्या घरफोडयांचे प्रमाण वाढल्याने व त्याबाबत वेगवेगळे स्वंतत्र गुन्हे दाखल झाल्याने परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नालासोपारा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता गुन्हयातील आरोपी हा नालासोपारा पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहण्यास असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. संशयीताबाबत अधिक माहिती प्राप्त करुन आरोपी नामे शिफत हबीबुर शेख वय-१९ वर्षे रा. निळेमोरे, नालासोपारा पश्चिम यास दिनांक १७/१०/२०२२ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये मागील काही दिवसामध्ये केलेल्या खालीलप्रमाणे ०७ गुन्हयांची कबुली दिली असून त्याचेकडून गुन्हयात चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ७,४०,५००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | गुन्हा रजि. नं. I ३४८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९४, ३४२, ५०६ अन्वये |
| ०२ | गुन्हा रजि. नं. I ३५५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०३ | गुन्हा रजि. नं. I ३७३/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०४ | गुन्हा रजि. नं. I ४५७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |

| | |
|---|---|
| ०५ | गुन्हा रजि. नं. I ४६८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०६ | गुन्हा रजि. नं. I ४७०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०७ | गुन्हा रजि. नं. I ४७४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/पंडीत मस्के, सपोनि/अमोल तळेकर, पोहवा/किशोर धनु, पोना/सचिन कांबळे, अमोल तटकरे, पोशि/ कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, प्रतिक पिंगळे, पोना/ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.




---ooo---